आ क्र धुमपा/निवडणूक/१२०
दि-१५/१२/२०२५

## धुळे महानगरपालिका

## जाहिर सूचना

विषय :- धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५
आदर्श आचार संहिता नियमावलीचे काटेकोर पालन करण्याबाबत.

मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी दिनांक १५/१२/२०२५ रोजी महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणूकोचा कार्यक्रम घोषित केला आहे. हा कार्यक्रम घोषित झाल्याच्या दिनांकापासून मतमोजणी संपेपर्यंतच्या कालावधीपर्यंत धुळे महानगरपालिका क्षेत्रात आदर्श आचार संहिता नियमावली लागू झालेली आहे. यानुसार धुळे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालय प्रमुख, सर्व राजकीय पक्ष/राजकीय पक्षांचे पदाधिकारी व सदस्य, महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिक यांना धुळे महानगरपालिका क्षेत्रात आदर्श आचार संहिता नियमावलीचे पालन करण्याबाबत सूचित करण्यात येत आहे.

मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी निश्चित केलेल्या आदर्श आचार संहिता नियमावलीच्या निर्देशांची प्रत आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in/Upload/PDF/Law%२०and%२०Order%२००४-१२-२०२५.pdf या संकेतस्थळावर व धुळे महानगरपालिकेच्या https://dhulecorporation.org/dmc-general-election-२०२५/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

धुळे महानगरपालिका क्षेत्रात आदर्श आचार संहिता अंमलबजावणी कालावधीत आदर्श आचार संहितेचे कोणतेही उल्लंघन होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. आदर्श आचार संहितेचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास मा.राज्य निवडणूक आयोगाने विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

15.12.2025

नितीन कापडणीस
आयुक्त तथा मुख्य निवडणूक अधिकारी
सार्वत्रिक निवडणूक - २०२५
धुळे महानगरपालिका